महाराष्ट्र शासन
गृह विभाग
# कारागृह व सुधारसेवा विभाग

सुधारणा व पुनर्वसन
फोन क्र : (०२०) २६१२३५६३
फॅक्सक्र: (०२०) २६१२५८७८
Email ID : igoffice.jud-mh@gov.in
Website : www.mahaprisons.gov.in
Email ID : igoffice.vig-mh@gov.in

अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे
जुनी मध्यवर्ती इमारत, २ रा मजला,
पुणे ४११ ००१

---

## परिपत्रक

जा.क्र. अपोमसं/सं.अ. /न्याय विभाग/ऐति.स्थळ भेट / ४६२ / २०२१ पुणे १ दि. २३/०१/२०२१

**विषय** : ऐतिहासिक बाबींची जाणीव होण्यासाठी शैक्षणिक संस्था तसेच नोंदणीकृत अशासकीय संस्था यांना भेटीची परवानगी देणेबाबत मानक कार्यप्रणाली ..

**संदर्भ** : शासन पत्र क्रमांक संकीर्ण - ०९२० प्र.क्रं १३४ / तुरुंग २ दिनांक २२/१/२०२१.

विषयांकित प्रकरणी संदर्भिय २२.१.२०२१ च्या पत्रान्वये प्राप्त जेल पर्यटन संदर्भात कारागृहांच्या कार्यपध्दतीत एकसुत्रता राहण्यासाठी शासनमान्यता प्राप्त सर्वसमावेशक मानक कार्यप्रणाली (SOP) खालील प्रमाणे आहे

सदर सर्वसमावेशक मानक कार्यप्रणालीची (SOP) अमंलबजावणी प्रथम येरवडा मध्यवर्ती कारागृह पुणे येथे दिनांक २६ जानेवारी २०२१ पासुन करण्यात येणार आहे व तदनंतर इतर कारागृहांमध्ये अमंलबजावणी करण्याबाबत कळविण्यात येईल.

भारतीय स्वातंत्र्य लढयाच्या तथा ऐतिहासिक बाबींची जाणीव होण्यासाठी विद्यापीठ / महाविद्यालय/ शाळा/ शैक्षणिक संस्था तसेच नोंदणीकृत सामाजिक संस्था यांना महाराष्ट्रातील विविध कारागृहातील ऐतिहासिक ठिकाणी भेटीसंदर्भात अवलंबण्यात येणारी कार्यप्रणाली:

१. पर्यटक म्हणुन भेटीसाठी विद्यापीठ/ महाविद्यालय व शाळा यांचे विद्यार्थी व शिक्षक तसेच शैक्षणिक संस्था व नोंदणीकृत सामाजिक संस्थांचे सदस्य/पदाधिकारी पात्र असतील. पर्यटक म्हणुन भेट देण्याच्या परवानगीचे अधिकार संबधीत कारागृहाचे अधीक्षक व त्यांचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना असतील.
२. या भेटीसाठी क्रं १ मधील संबंधीत संस्थेचे पदाधिकारी किमान सात दिवस अगोदर अधीक्षकांकडे अर्ज करुन परवानगी घेतील. परवानगी देतेवेळी अधीक्षक दिनांक ठरवुन देतील. सदर भेटीची वेळ ही दुपारी १२:०० ते ३:०० च्या दरम्यान असेल.
३. पर्यटक म्हणुन भेटीसाठी एका दिवशी जास्तीत जास्त ५० व्यक्तींना प्रवेश देण्यात येईल.

Scanned with CamScanner

४. कोविड-१९ चा प्रादुर्भाव कारागृहांमध्ये पसरु नये यासाठी मेन गेटच्या बाहेर पर्यटक म्हणुन आलेल्या व्यक्तींचे तापमान, ऑक्सीजन लेवल व सर्वसाधारण वैद्यकिय स्थिती अधीक्षक तपासुन घेतील व कोविड-१९ च्या अनुषंगाने संशयास्पद पर्यटकांना भेट नाकारतील.

भेटीसाठी आलेल्या पर्यटकांचे मेनगेट बाहेर कारागृह प्रवेशापुर्वी हात सॅनिटायझर/ साबणाने स्वच्छ धुतले जातील तसेच संपुर्ण भेटीदरम्यान पर्यटकांनी चेहऱ्यावर मास्क परिधान केलेला असेल. तसेच पर्यटक सुरक्षित अंतराचे (Social Distancing) पालन करतील.

५. भेटीसाठी आलेल्या कोणत्याही व्यक्तीस कारागृहामध्ये प्रवेश देणे योग्य राहणार नाही, असे कारागृह अधीक्षकांचे मत असल्यास संबधीत कारागृह अधीक्षक याबाबतची संयुक्तीक कारणे नोंदवहीमध्ये नोंदवुन भेट नाकारतील.

६. कारागृह भेटीसाठी आलेल्या वर नमुद पर्यटकांसाठी किती शुल्क आकारणी करावयाची आहे याबाबत यथावकाश कळविण्यात येईल. तोपर्यंत वर नमुद पर्यटकांना विनाशुल्क प्रवेश देण्यात यावा.

७. पर्यटक म्हणुन भेट देणाऱ्या व्यक्तीच्या ओळखीची खात्री करुन घेणेसाठी उपरोक्त मुद्दा क्रमांक ०१ मधील पदाधिकारी संस्थेच्या लेटरहेडवर नावाची यादी सहीनिशी संबधीत कारागृह अधीक्षकांकडे सादर करतील. प्रवेश देतेवेळी पदाधिकारी तथा यादीतील विद्यार्थी / व्यक्ती यांची ओळख,शाळा/ महाविदयालयाचे ओळखपत्र, आधारकार्ड, संस्थेचे ओळखपत्र किंवा पासपोर्टचे माध्यमातुन खात्री करुन घेतील. तसेच , भेट देण्याऱ्या पर्यटकाचा एक पासपोर्ट साईज फोटो संबधीत कारागृह अधीक्षक त्यांचा स्वतंत्रपणे अभिलेख ठेवतील. तसेच सदरील अभिलेखामध्ये क्रमांक ०४ व ०५ अन्वये नाकारलेल्या पर्यटकांची नोंदसुद्धा कारणासह घेतील.

८. कारागृह / बंदयाच्या अभ्यासासाठी /संशोधनासाठी येणाऱ्या संशोधकांना उक्त नियमाखाली पर्यटक म्हणुन भेट देता येणार नाही.

९. पर्यटक म्हणुन भेटीसाठी येणा-या व्यक्तींना कारागृहाचे सर्व नियम, अधिनियम, अटी व शर्ती लागु असतील व याचे काटेकोरपणे पालन होईल याची संबधीत कारागृह अधीक्षक दक्षता घेतील. तसेच पर्यटक म्हणुन भेटीच्या वेळी कोणतेही खाद्यपदार्थ, कॅमेरा, मोबाईल फोन तसेच कारागृहाचे प्रचलित अधिनियमाखालील प्रतिबंधित वस्तु कारागृहामध्ये नेता येणार नाहीत.

१०. पर्यटक म्हणुन भेटीच्या वेळी येणाऱ्या व्यक्तीस कारागृहातील ऐतिहासिक स्थळाची माहिती देण्यासाठी जेल टुरिझम गाईड म्हणुन प्रशिक्षित अधिकारी/ कर्मचारी संबधीत कारागृहाचे अधीक्षक नेमतील. या कारागृह भेटीसाठी आलेल्या पर्यटकांवर देखरेखीसाठी संबधीत कारागृह अधीक्षक किमान एक तुरुंग अधिकारी व तीन कर्मचारी नेमतील. टुरिझम गाईड हे भेटीसाठी येणाऱ्या पर्यटकांना विविध ठिकाणची वस्तुनिष्ठ माहिती सुलभपणे देतील.

११. कोविड-१९ च्या अनुषंगाने घ्यावयाची सर्व खबरदारी पर्यटक पार पाडत आहेत, याची दक्षता देखरेखीसाठी नेमलेले अधिकारी / कर्मचारी घेतील.

१२. पर्यटक म्हणुन भेटीसाठी निवडण्यात आलेल्या व्यक्तींना ऐतिहासिक ठिकाणाव्यतीरीक्त कारागृहाच्या अन्य कोणत्याही जागी जाण्याची परवानगी असणार नाही, याबाबतची दक्षता देखरेखीसाठी नेमलेले अधिकारी/ कर्मचारी घेतील.

१३. पर्यटक म्हणुन भेटीसाठी आलेल्या व्यक्तीला कुठल्याही बंद्याशी संवाद साधता येणार नाही व याबाबतची दक्षता देखरेखीसाठी नेमेलेले अधिकारी/ कर्मचारी घेतील.

१४. पर्यटनाच्या वेळी करावयाचे छायाचित्रण वा व्हिडीओग्राफीसाठी अधीक्षक वेगळे कर्मचारी नेमतील, जे फक्त ऐतिहासिक ठिकाणीच आवश्यक असेल तेवढेच छायाचित्रण वा व्हिडीओग्राफी करतील व भेट संपल्यानंतर पर्यटकांना निशुल्क पुरवतील.

Scanned with CamScanner

१५. पर्यटकांच्या भेटींमुळे कारागृहाचे दैनंदिन कामकाज तसेच कारागृहीन सुरक्षेस कोणतीही अडचण निर्माण होणार नाही, याची दक्षता संबधीत कारागृह अधीक्षक घेतील.

१६. कारागृहातील अधीक्षक संबंधीत कारागृहातील ऐतिहासिक स्थळाची माहिती कारागृहाच्या प्रवेशव्दाराजवळ फलकावर अधोरेखेतीत करतील.

(सुनिल रामानंद)
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य,पुणे ०१

**प्रति,**

**१) विशेष पोलिस महानिरीक्षक (कारागृह) दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई**
**२) कारागृह उपमहानिरीक्षक , पुणे/नागपुर/औरंगाबाद.**
**३) प्राचार्य, दौलतराव जाधव तुरंग अधिकारी प्रशिक्षण महाविदयालय पुणे.**
**४) अधिक्षक मध्यवर्ती कारागृह (सर्व)**
**५) अधिक्षक जिल्हा कारागृह (सर्व)**
**६) अधिक्षक खुले जिल्हा कारागृह (सर्व)**
**७) प्राचार्य , किशोर सुधारालय, नाशिक.**
**८) अधिक्षक , रत्नागिरी विशेष कारागृह रत्नागिरी.**
**९) संपर्क अधिकारी, स्वतंत्रपुर खुली वसाहत आटपाडी.जि.सांगली**

**प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :-**
**१) कारागृह उपमहानिरीक्षक, मुख्यालय, अपोमसंवमकावसुसे, महाराष्ट्र राज्य पुणे १**
**२) स्वीय सहायक , अपोमसंवमकावसुसे, महाराष्ट्र राज्य पुणे १**
**३) लेखाधिकारी, अपोमसंवमकावसुसे, महाराष्ट्र राज्य पुणे १**

Scanned with CamScanner